नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३११ Issue - 311 | वार गुरुवार दि. २ एप्रिल २०२६ Blow- Thursday Date 2 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मजुरांच्या गाडीला ट्रकची धडक, ८ जणांचा मृत्यू

## जालन्यात समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; महिला मजुरांच्या लहानग्यांचा मन हेलावणारा आक्रोश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : जालन्यात समृद्धी महामार्गावर बुधवारी झालेल्या भीषण अपघातामध्ये आठ जणांचा मृत्यू झाला आहे. तर दोन जण गंभीर जखमी आहेत. प्राथमिक माहितीनुसार, समृद्धी महामार्गावरील (रिर्ीिववहळ ारहरार-ीस) कडवंची गावाजवळ हा अपघात (ललळवशपीं) झाला. कडवंची गावाकडून जालना शहराकडे येणाऱ्या मजुरांच्या पिक अपला मागून येणाऱ्या भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत आठ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये सहा महिलांचा समावेश आहे. या महिला समृद्धी महामार्गावर सफाईचे काम करत होत्या. काम आटोपून या महिला पिकअप व्हॅनमध्ये बसल्या होत्या. त्यावेळी मुंबईच्या दिशेने निघालेल्या भरधाव ट्रकने पिकअप व्हॅनला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, आठ महिलांनी जागेवरच प्राण सोडला. (चरहरीरीहीर डरींशीीं पशुी)

हा अपघात झाल्यानंतर मदतीसाठी पोलीस घटनास्थळी उशीरा पोहोचले, असा आरोप होत आहे. यामुळे स्थानिक नागरिक संतापले होते. या अपघाताचे नेमके कारण अद्याप कळू शकलेले नाही. दोन जण गंभीर जखमी असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. मात्र, यानिमित्ताने समृद्धी महामार्गावरील अपघातांचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

या अपघातानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करुन मदतीची घोषणा केली आहे. जालनानजीक समृद्धी महामार्गावर झालेल्या एका अपघातात ८ जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या घटनेत जे लोक जखमी झाले त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे आणि स्थानिक प्रशासन समन्वय साधून आहेत. जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक स्वतः तेथे आहेत. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. या अपघातातील मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकारतर्फे देण्यात येईल,



असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

नागपूरहून मुंबईच्या दिशेने वेगाने जाणाऱ्या ट्रकने मजुरांच्या या ट्रकला धडक दिल्याचे समजते. या अपघातानंतर रस्त्यावर रक्ताचे डाग आणि महिला मजुरांचे मृतदेह दिसत होते. या मजुरांच्या मृत्यूची बातमी समजताच त्यांचे नातेवाईक अपघातस्थळावर पोहोचले. याठिकाणी आपल्या आप्तजनांचे मृतदेह पाहून लहानग्या मुलांनी एकच आक्रोश केला.

# महाराष्ट्राला अवकाळीचा तडाखा सुरुच, मराठावाडा, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र ते खान्देशात जोरदार पाऊस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : भारतीय हवामान विभागानं राज्यात विविध ठिकाणी पुढील तीन दिवसात पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला होता. त्यानुसार राज्यात विविध ठिकाणी पावसानं हजेरी लावल्याचं पाहायला मिळालं. बीड, जालना, सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, धुळे, वाशिम, सिंधुदुर्गमध्ये पावसानं हजेरी लावली. रब्बी हंगामातील पिकांच्या काढणीचा हंगाम सुरु असताना अवकाळी पाऊस हजेरी लावतत असल्यानं शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण होत आहे. काही ठिकाणी फळबागांना फटका बसला आहे. बीड शहरासह परिसरात सलग तासभर विजेच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. जिल्ह्याला हवामान विभागाकडून ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. अचानक झालेल्या पावसाने नागरिकांची धांदल उडाली होती. तर, शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी देखील साचले. सलग तासभर झालेल्या पावसामुळे नागरिकांना छत्री आणि रेनकोटचा वापर करावा लागला. बीड परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. या पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला असता तरी शेतकऱ्यांना मात्र याचा सर्वाधिक फटका



बसला आहे. बीडसह गेवराई तालुक्याला अवकाळी पावसाने झोडपून काढलंय. गेवराई तालुक्यातील लुकामसला, भाटेपुरी, रोहितळ, तलवाडा शिवारात गारांचा मारा झाला. या पावसाने काढणीला आलेल्या बाजरीचे नुकसान झाले. हवामान विभागाने बीड जिल्ह्याला आज यलो तर उद्या ऑरेंज अलर्ट दिलाय. या पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरी ग्रामीण भागातील शेतकरी अडचणीत सापडले आहेत. अवकाळीसह गारपीट झाल्याने काढणीला आलेली पिकं आणि फळबागांना फटका बसला आहे. सिंधुदुर्गातील सह्याद्रीच्या पट्ट्यात सायंकाळी अवकाळी पावसानं हजेरी लावली. वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह (पान ४ वर...)

# अनुदानित रासायनिक खतांचे वितरण आता 'फार्मर आयडी'वर होणार : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानित रासायनिक खतांच्या वितरणात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी आता 'फार्मर आयडी'चा वापर करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

केंद्रीय कृषी मंत्री शेतकरी कल्याण मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली फार्मर आयडीसह इतर विषयांवर ऑनलाईन बैठकीप्रसंगी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली. अग्रीस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडीचा वापर करून देशातील पहिला पायलट प्रकल्प महाराष्ट्रात राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

या उपक्रमामुळे खतांचे वितरण अधिक नियोजनबद्ध, अचूक आणि पारदर्शक पद्धतीने होणार असून, शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ थेट आणि योग्य पद्धतीने मिळणार आहे. तसेच बनावट व्यवहारांना आळा बसून प्रणाली अधिक विश्वासार्ह होणार आहे, अशी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली

दरम्यान, या बैठकीत महाराष्ट्रात अग्रीस्टॅक योजनेअंतर्गत सर्वाधिक प्रमाणात फार्मर आयडी तयार करण्यात आल्याबद्दल केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे अभिनंदन केले. तसेच अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना केवळ चार दिवसांत सर्वाधिक निधीचे वितरण करण्यात आल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले. केंद्रीय मंत्री चौहान यांनी पुढील काळात सर्व योजनांमध्ये फार्मर आयडीचा वापर वाढविण्याच्या सूचना दिल्या असून, महाराष्ट्राचा हा उपक्रम इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**फडणवीस सरकारने घेतले महाराष्ट्राच्या हिताचे सहा निर्णय**

# साकळाई योजनेला १,२३४ कोटी, दिव्यांगांच्या शिष्यवृत्तीत मोठी वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठक महाराष्ट्राच्या हिताचे सहा निर्णय झाले.

१. साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी एक हजार २३४ कोटी रुपयांची तरतूद : अहिल्यानगर जिल्ह्यातील चिखली (ता.श्रीगोंदा) तालुक्यातील साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १ हजार २३४ कोटी १३ लाख रुपयांच्या तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. साकळाई उपसा सिंचन योजना घोड धरणाच्या जलाशयावरील म्हसे या गावात उभी केली जाणार आहे. म्हसे गाव येथून चार टप्प्यांमध्ये पाणी उचलून ते श्रीगोंदा व अहिल्यानगर या दोन तालुक्यातील ३२ गावांसाठी वापरता येणार आहे. यामुळे या अवर्षणग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्यासह सुमारे ९ हजार ६०० हेक्टर क्षेत्रास सिंचन उपलब्ध होणार आहे. या योजनेत लाभक्षेत्रात विकेंद्रीत जलसाठे निर्माण केले जाणार आहेत. त्यामध्ये ल. पा. तलाव, पाझर तलाव, सिमेंट नाला बंधारे व गाव तलावांचा वापर केला जाणार आहे. या योजनेमुळे सिंचनासाठी १.६० टीएमसी व पिण्यासाठी ०.२० टीएमसी असा एकूण १.८० टीएमसी उपलब्ध होणार आहे.



२. महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन : राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नदी संवर्धन-पुनरूज्जीवन करण्यासाठी नियामक आणि विकासात्मक अशी दोन्ही कामे करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेच्या धर्तीवर राज्यात स्थापन करण्यात येणाऱ्या या प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील, तर उपाध्यक्ष पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री असतील. वित्त मंत्री, नगरविकास मंत्री, जलसंपदा मंत्री, उद्योग मंत्री, ग्रामविकास व पंचायतीराज मंत्री सदस्य असतील पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सचिव हे सदस्य-सचिव असतील. भारतात १० प्रमुख नद्या आहेत. त्यापैकी ४ नर्मदा, तापी, गोदावरी व कृष्णा या महाराष्ट्रात आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२५ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार देशभरात २९६ प्रदूषित नदी-पट्टे असून त्यापैकी सर्वाधिक प्रदूषित नदी-पट्टे ५४ महाराष्ट्रात आहेत. यात मिठी, काळू, मुळा, मुळा-मुठा, मुठा, भीमा, पवना, नाग, चंद्रभागा, पंचगंगा अशा नद्यांचे प्रदूषण-पुनरूज्जीवन याबाबत निर्णय घेता येणार आहे. त्यानुषंगाने नदी पुनरूज्जीवनाच्या सर्व पैलूंना चालना देणारी प्रमुख संस्था-नोडल एजन्सी म्हणून तसेच सर्वोच्च निर्णय घेण्यासाठी प्राधिकरण काम करणार आहे. प्राधिकरण या ५४ प्रदूषित नदी पट्टयांसाठी पुनरूज्जीवनासाठी टप्प्याटप्प्याने प्राधान्यक्रम निश्चित करेल. विविध योजनांचे एकत्रिकरण करून पूरक धोरणांची म्हणजेच सांडपाणी प्रक्रिया, औद्योगिक सांडपाण्यासंबंधात उपाययोजना, अतिक्रमणे रोखण्यासाठी नदीकाठचे क्षेत्र निश्चित करण्यासाठी शिफारस करेल. प्राधिकरण अंमलबजावणीसाठी विविध विभागांदरम्यान समन्वय साधेल तसेच जनजागृती, लोकसहभाग वाढविण्यासाठी आराखडे तयार करेल. नदी खोरे व्यवस्थापन आराखडे तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे, भूसंपादन, अतिक्रमणे, वीजपुरवठा आणि करारांचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी या प्राधिकरणाकडे असेल. प्राधिकरणात पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती तसेच एक समर्पित सचिवालयही काम करणार आहे. या सचिवालयात विविध स्वयंसेवी संस्था, पर्यावरण व जैवविविधता क्षेत्रात काम करणाऱ्या बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी-बीएनएचएस, मॅन्ग्रोव्ह सेल अशा संस्थांचाही समावेश असेल. प्राधिकरणासाठी आवश्यक २ हजार कोटींचा निधी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून उभारण्यास तसेच शासनाचे योगदान म्हणून १०० कोटींचा निधी देण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच गौण खनिज उत्खननातून मिळणाऱ्या रकमेच्या १० टक्के इतका निधी दरवर्षी प्राधिकरणास देण्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय विविध कंपन्यांकडून मिळणारा सामाजिक दायित्व निधी, विविध वित्तीय संस्थांकडून होणारा मिश्र वित्त पुरवठा या माध्यमातून प्राधिकरणासाठी निधी उभारला जाणार आहे.

३. अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी मौजे नवसारी येथील जमीन : अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी मौजे नवसारी येथील १६ हजार ७०८ चौ.मी.जमीन देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. अमरावती महानगरपालिकेला क्रीडा संकुलासाठी ही जमीन देण्यात आली होती. आता या जमिनीचा अंतिम ताबा देण्यास तसेच आतापर्यंत केलेल्या वाणिज्य वापरासाठी आकारण्यात आलेले शुल्क माफ करण्यास मान्यता देण्यात आली. याबाबत अमरावती महापालिकेने विनंती केली होती. यामुळे या जागेवर क्रीडा सुविधांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

४. अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण : राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाबाबत उपवर्गीकरण समितीच्या अहवालावर राज्य मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झाल्यावर या विषयावर प्राप्त निवेदने, अर्जांचा विचार करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षण उपवर्गीकरणासाठी पाटणा उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल सादर केल्यावर तो आज मंत्रिमंडळापुढे मांडण्यात आला. त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या निवेदने, सूचना व अर्जांचा विचार करण्याच्या दृष्टीने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीने याबाबतची कार्यवाही करून, एक महिन्याच्या मुदतीत अहवाल मंत्रिमंडळापुढे सादर करावा, असा निर्णय घेण्यात आला.

५. भूमि अभिलेख विभागात आता भूकरमापक पदाऐवजी परिरक्षण भूमापक पद : भूमि अभिलेख विभागातील गट क संवर्गातील भूकरमापक हे पद रद्द करून परिरक्षण भूमापक असे पद निर्माण करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. ही पदे रद्द करण्यात आलेल्या भूकरमापक संवर्गातून नियमित पदोन्नतीने व विभागीय परीक्षेद्वारे प्रत्येकी ४० टक्के आणि सरळसेवेने २० टक्के या प्रमाणात भरली जातील. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने भूमि अभिलेख विभागाचा सुधारित आकृतीबंध तयार केला आहे. यामध्ये नियमित ९ हजार ६३८ आणि कंत्राटी १ हजार ४५ अशा एकूण १० हजार ६८३ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी भूकरमापक व परिरक्षण भूमापक या संवर्गामध्ये एकूण ६ हजार ९३७ पदे मंजूर आहेत. भूकरमापक पदाच्या शैक्षणिक पात्रता आणि कामाचे स्वरुप पाहता, त्यांना विहित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार महसूल विभागाने हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केला. भूकरमापक संवर्ग रद्द करुन ही पदे पदोन्नती व विभागीय परीक्षेद्वारे टप्प्याटप्प्याने परिरक्षण भूमापक संवर्गामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत. भूकरमापक पदे टप्याटप्याने परिरक्षण भूमापक संवर्गामध्ये समाविष्ट झाल्यानंतर हा एकच संवर्ग अस्तित्वात राहील. तसेच गट क संवर्गामध्ये नियुक्तीचा प्रथम स्तर संवर्ग असेल. या संवर्गातील कर्मचाऱ्यांची एकत्रित ज्येष्ठता यादी प्रादेशिक स्तरावर ठेवण्यात येणार आहे. या दोन्ही पदांची कर्तव्य व जबाबदारी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे हे निश्चित करतील. तर सेवाप्रवेश नियम सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने सुधारित करण्यात येतील.

६. राज्यातील हजारो दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये भरीव वाढ : राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे शिशुवर्ग ते आठवी, नववी ते दहावी तसेच अकरावी व बारावीत शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत भरीव वाढ होणार आहे. महाराष्ट्राच्या व्हिजन डॉक्यूमेंटमध्ये शिक्षण आणि कौशल्य विकास वृध्दिंगत (पान २ वर...)

## संपादकीय....

### पुनरुज्जीवन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील पाणी, पर्यावरण, शिक्षण आणि प्रशासनाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राज्यातील ५४ प्रदूषित नदी पट्ट्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. याचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील. मिठी, मुळा-मुठा, भीमा आणि पंचगंगा यांसारख्या नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी २,००० कोटींचा निधी उभारण्यासही मान्यता देण्यात आली आहे. अहिल्यानगरमधील साकळाई सिंचन योजनेसाठी १२३४ कोटींची मंजुरी, ५४ प्रदूषित नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी स्वतंत्र प्राधिकरण, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ असे महत्त्वाचे निर्णय या बैठकीत घेण्यात आले. याशिवाय आरक्षण उपवर्गीकरणावर समिती, अमरावतीत क्रीडा संकुलासाठी जमीन आणि भूमि अभिलेख विभागातील प्रशासकीय बदलांनाही मंजुरी देण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा आणि नगर तालुक्यातील ३२ गावांसाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १,२३४ कोटी १३ लाख रुपयांच्या तरतुदीला मंजुरी मिळाली. घोड धरणातून १.८० टीएमसी पाणी उचलून ९,६०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. शिशुवर्ग ते बारावीपर्यंतच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत भरीव वाढ करण्यात आली आहे. आता शिशुवर्ग ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये, तर ११ वी-१२ वीच्या निवासी विद्यार्थ्यांना १,००० रुपये शिष्यवृत्ती मिळेल. यापूर्वी ही रक्कम केवळ १०० ते २०० रुपयांच्या दरम्यान होती.

# भीम प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## ५ एप्रिल रोजी होणार वितरण : विविध क्षेत्रातील मान्यवरांचा होणार गौरव; पुरस्काराचे हे २६ वे वर्ष आहे.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : येथील भीम प्रतिष्ठानतर्फे विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी विविध क्षेत्रातील आठ जणांची निवड करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक बाबा बाबरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पुरस्काराचे वितरण सोहळा येत्या रविवार दि. ५ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता सोलापुरातील शिंदे चौकातील शिवस्मारक सभागृह येथे मसाप पुण्याच्या मुख्य कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक यांच्या हस्ते व समाज कल्याण सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख नगरसेवक अमोल शिंदे, ज्येष्ठ पत्रकार प्रशांत माने, दिगंबर भगरे, रावजी सखाराम हायस्कूलचे प्राचार्य भारत केत, उद्योजक पद्मचंद राका, राजेंद्र शहा (कासवा), उदय वैद्य, विठ्ठल शिवशरण, डॉ. शिवाजी पवार, धर्मेंद्र माने आदींची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे बाबरे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस संयोजक अमित बाबरे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, उपाध्यक्ष ॲड. विशाल मस्के, सचिव अकबर शेख, कार्याध्यक्ष सिब्दांत बाबरे, ॲड. स्वाती मस्के उपस्थित होते.

### यांचा होणार पुरस्काराने सन्मान

**भीमराव मोरे (सामाजिक), सीमा भंडारी (शैक्षणिक), बलभीम पारखे (कामगार), किरण बनसोडे (पत्रकारिता), रुक्मिणी लांबतुरे (गौरव पुरस्कार), प्रकाश शेळके (विशेष गौरव पुरस्कार), रेणुका हिरेमठ (सन्मानपत्र), प्राजक्ता सोलंकर (सन्मानपत्र) तर आदर्श पालक पुरस्कारासाठी कृष्णा व रत्नमाला माने यांची निवड करण्यात आली आहे. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.**




# हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

राज्यात ५५ लाख नागरिकांना औषधोपचाराचा लाभ देण्याचे उद्दिष्ट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

नागपूर ग्रामीण भागात मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर

एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश

महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.

ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, 'आयडीए' उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय हत्तीरोग निर्मूलन शक्य नसल्याचेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

# 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान १ एप्रिल २०२६ पासून राज्यभर सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी आणि ग्रामस्तरावर सर्वसमावेशक आरोग्य सेवा बळकट करण्याच्या उद्देशाने माझं गाव, आरोग्य संपन्न गाव हे महत्त्वाकांक्षी अभियान दि. १ एप्रिल २०२६ पासून पुढे वर्षभर ३१ मार्च २०२७ पर्यंत राज्यासह ठाणे जिल्ह्यामध्ये राबविण्यात येणार आहे.

या अभियानाचा मुख्य उद्देश प्रत्येक नागरिकाला प्रतिबंधात्मक, सुलभ, गुणवत्तापूर्ण व सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करून देत निरोगी, सक्षम आणि जागरूक ग्रामीण समाज निर्माण करणे हा आहे. प्रजा निरोगी, तर राज्य सशक्त या तत्त्वज्ञानावर आधारित हे अभियान ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणार असून लोकसहभागाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता व बालमृत्यू दरात घट करणे, पोषण, स्वच्छता व शुद्ध पाणी यावर भर देणे, तसेच नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करणे यावर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. यामध्ये क्षयरोग, कुष्ठरोग, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांबरोबरच मधुमेह, उच्च रक्तदाब आणि कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांवरही प्रभावी नियंत्रण ठेवण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच, ३० वर्षांवरील नागरिकांची असंसर्गजन्य आजार (मधुमेह, उच्चरक्तदाब, कर्करोग) नियमित आरोग्य तपासणी, गर्भवती महिलांची १००% नोंदणी व तपासणी, बालकांचे संपूर्ण लसीकरण, तसेच पोषण सुधारणा यांसाठी ठोस उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

आरोग्य सेवांसोबतच स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, मानसिक आरोग्य आणि जीवनशैली सुधारणा यांनाही समान प्राधान्य हे अभियान केवळ आरोग्य तपासणीपुरते मर्यादित नसून, ग्राम विकासाच्या सर्व घटकांना एकत्र आणणारे व्यापक व्यासपीठ ठरणार आहे. ग्रामपंचायत, आरोग्य संस्था, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामस्थ यांचा सक्रिय सहभाग यात अपेक्षित आहे.

या अभियानाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत केली जाईल. प्रत्येक ग्रामपंचायतीने १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत नोंदणी करणे आवश्यक राहील.

अभियानादरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना आरोग्य संपन्न ग्राम म्हणून गौरविण्यात येणार असून त्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देण्यात येईल.

राज्य, विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्राम पंचायत स्तरावर विविध बैठका, मेळावे, रॅली. जनजागृती उपक्रम आणि आरोग्य शिबिरे आयोजित करून अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. यामध्ये विविध विभागांमधील समन्वयावर विशेष भर देण्यात आला आहे. 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान आरोग्य क्षेत्रातील एक लोकचळवळ ठरणार असून प्रत्येक नागरिकाने यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवून आपले गाव आरोग्यदृष्ट्या सक्षम बनवावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी केले आहे.

# राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या बदनामीसाठी रोहित पवारांनी एजन्सीला ५ कोटींचं पॅकेज दिलंय; सूरज चव्हाणांचा गंभीर आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रोहित पवार यांच्या टीमकडून गेल्या काही दिवसांपासून जाणीवपूर्वक राष्ट्रवादी काँग्रेसला बदनाम करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. याच्यापुढे जर बदनामी करण्याचा प्रयत्न केला तर जशास तसे उत्तर दिले जाईल. आमच्या पक्षात कोणी चुकत असेल तर त्याला शिक्षा देण्याचा अधिकार सुनेत्रा वहिनींना आहे. सध्या जे काही राजकारण केले जात आहे ते योग्य नाही, अशी टीका अजितदादा गटाचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी केली. ते मंगळवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर प्रचंड आगपाखड केली. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि नेत्यांना बदनाम करण्यासाठी तुतारी गटाकडून सातत्याने प्रयत्न केला जात आहे. तुतारी गटाचं जेवढं स्वतःच्या पक्षावर लक्ष नाही तेवढं लक्ष आमच्या पक्षावर आहे. सातत्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट कशी पडेल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बदनाम कसा होईल, यासाठी प्रयत्न केला जात आहे. तुमचे मोहोळचे आमदार कोणाच्या बॅनरखाली काम करत आहेत ते बघा आणि नंतर बोला. आम्हाला माहिती मिळाली की, रोहितदादा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला बदनाम करण्यासाठी आणि फूट पाडण्यासाठी एका एजन्सीला ५ कोटी रुपयांचे पॅकेज दिले आहे. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना खोटे आरोप करण्यासाठी नेमणुका केल्या आहेत. हे पदाधिकारी सातत्याने राष्ट्रवादी काँग्रेसला बदनाम करण्याचे आणि फूट पाडण्यासाठी काम करत असल्याचा आरोप सूरज चव्हाण यांनी केला. त्यांच्याच एका प्रवक्त्याने पत्रकार परिषद घेऊन अशी बातमी सोडली की, राष्ट्रवादी काँग्रेसच्या संविधानातून काही फ्रंटल वगळण्यात आले. त्यामध्ये ओबीसी, सामाजिक आणि इतर सेलचा समावेश असेल. प्रसारमाध्यमांना अर्धवट माहिती देण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसची जी घटना आहे, त्यामध्ये पक्ष स्थापन झाल्यापासून फ्रंटलचे पाच विभाग आहे आणि सेल आपल्याला वाढवता येतात. फ्रंटलमध्ये एक येते फादर बॉडी, महिला काँग्रेस, युवकची बॉडी, विद्यार्थी आणि सेवादल हे फ्रंटलचे भाग आहेत. हाच कागद दाखवून महाराष्ट्राची दिशाभूल करण्यात आली. त्यांनी असं सांगितलं.

## महिला कुस्ती स्पर्धेसाठी दरवर्षी ५० लाखाचा निधी शासनाकडून मिळण्यासाठी प्रस्ताव पाठवणार

# महिला कुस्ती स्पर्धेसाठी शासनाचा भक्कम पाठिंबा : पालकमंत्री जयकुमार गोरे









■ **कोल्हापूरच्या अमृता पुजारी यांनी महाराष्ट्र केसरी किताब पटकावला.**

■ **चौथी महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा उत्साहात संपन्न**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाक : हरीभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणात चौथी महिला महाराष्ट्र केसरी व वरिष्ठ गट महिला राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा तसेच विविध गटातील पुरुष कुस्ती स्पर्धेसाठी २५ लाखाचा निधी जाहीर केला. तर पुढील वर्षीपासून महिला कुस्ती स्पर्धेसाठी ५० लाखाचा निधी देण्याबाबत मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे प्रस्ताव देण्यात येणार असल्याचे सांगून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महिला कुस्ती स्पर्धेला शासनाचा भक्कम पाठिंबा असल्याचे सांगितले.

हरीभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणात आयोजित महिला महाराष्ट्र केसरी व वरिष्ठ गट महिला राज्यस्तरीय अजिंक्य कुस्ती स्पर्धेच्या समारोप प्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, हिंदकेसरी योगेश दोडके, ट्रिपल महाराष्ट्र केसरी भाग्यश्री फड, महाराष्ट्र केसरी मुन्नालाल शेख, समाधान घोडके, नगरसेविका रोहिणी तडवळकर, आयोजक स्वाती अळ्ळीमोरे-साखरे, अक्कलकोट अन्नछत्र ट्रस्टचे अध्यक्ष जन्मेजय राजे भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे म्हणाले की, कैलासवासी सिद्धाराम साखरे यांच्या स्मरणार्थ आयोजित ही कुस्ती स्पर्धा महिलांच्या कुस्ती क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. महाराष्ट्रातील रणरागिनींना राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून देण्याचे कार्य या स्पर्धेच्या माध्यमातून होणार आहे. कुस्तीपटू गीता व बबीता फौगाट यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल केले असून त्यांच्याप्रमाणे महाराष्ट्रातील महिला खेळाडूही पुढे येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्पर्धेतील अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या अमृता पुजारी यांनी महाराष्ट केसरी किताब पटकावला. या स्पर्धेत मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले व युवराज केचे यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट . सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai mbedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

**प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# तरुणांनी स्पर्धा परीक्षेत सहभागी होऊन शासकीय नोकऱ्या मिळवाव्यात

## उपायुक्त व संचालक महादेव जगताप ; आर.के.बी.एड.,डी.एड.लॉ कॉलेजच्या आर.के.युवा 'ज्ञानप्रवाहाचे' प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/पंकजकुमार पाटील : भांडुप येथील सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळाच्या आर.के.बी.एड व डी.एड, विधि महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र यांचे संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन व कला क्रीडा महोत्सवाचा बक्षीस समारंभ विभागीय संचालक श्री वामन नाखले, ठाणे महानगरपालिका उपायुक्त महादेवराव जगताप, मनपा कर्मचारी बँकेचे संचालक व मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य श्री प्रदीप सावंत, सिनेट सदस्य शशिकांत झोरे, श्री मयूर पांचाळ, जेजेटीयू विद्यापीठाचे श्री नायकोडी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य श्री गायकवाड, संस्थेचे संचालक रमेश





खानविलकर आदी मान्यवरांच्या उपस्थित पार पडला.

संचालक रिद्धेश खानविलकर यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांचे लेख असलेले विधी महाविद्यालयाचे ठ. घ. गणठख'ड गजणठछङ व शिक्षणशास्त्राचे ज्ञानप्रवाह वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

विभागीय संचालक श्री वामन नाखले यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे कौतुक केले. श्री महादेव जगताप उपायुक्त व संचालक यांनी तरुणांनी स्पर्धा परीक्षेत सहभागी होऊन केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग यांच्या परीक्षा देऊन प्रशासनात येणे आवश्यक असून रिद्धेश खानविलकर सारखे तरुण या महाराष्ट्रात तयार होणे आवश्यक आहे असे म्हणाले.

मुंबई विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रदीप सावंत , सिनेट सदस्य शशिकांत झोरे, सिनेट सदस्य मयूर पांचाळ यांनी प्रशस्त इमारत, भव्य वाचनालय, विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या सुविधा, प्राध्यापक वर्ग,व रिद्धेश खानविलकर यांचे नियोजन त्यामुळे संस्था अधिक प्रगती पथावर भविष्यात जावो अशी इच्छा व्यक्त केली.

---

## मी आज पंचायत समितीचा सभापती झालो हे बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संवेदनामुळे : डॉ. शुभम आगवणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातून प्रत्येकाला माणूस म्हणून जगण्यासाठी संधी संविधानातून दिली.

आज बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाच्या अधिकारामुळे मी पंढरपूर पंचायत समितीचा सभापती झालो हे बाबासाहेबांचे माझ्यावर आणि आपण सर्वावर थोर उपकार आहेत असे म्हणतात पंढरपूर पंचायत समिती सभापती डॉक्टर शुभम आगवणे यांनी काढले.





विश्व भूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मध्यवर्ती जयंती समितीच्या वतीने आयोजित रंगभरण स्पर्धेचे उद्घाटन सभापती डॉक्टर शुभम आगवणे यांच्या हस्ते झाले यावेळी ती बोलत होते कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि राष्ट्रवादी व्यापार व उद्योग सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश दादा फाटे होते.

या कार्यक्रमास आरपीआयचे ज्येष्ठ नेते सुनील सर्व गोड, जितेंद्र बनसोडे, आरपीआय तालुकाध्यक्ष संतोष पवार, शिंदे गटाचे युवा सेनेची शहराध्यक्ष संग्राम अभंगराव, समितीचे अध्यक्ष अभिराज उबाळे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र आठवले, समाधान लोखंडे शैलेश आगवणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

रंगभरण स्पर्धेचे शहरातील सर्व प्रचालीतील दिशेकडून विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. महेश मोठे योगेश जाधव, कृष्णा सर्व गोड, सुरज साखरे, रुपेश वाघमारे स्वप्निल कांबळे, अजिंक्य ओव्हाळ यांच्यासह भीम जयंती सार्वजनिक उत्सव मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### स्वर्गीय महादेव आवताडे यांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील आमदार समाधान आवताडे यांची वडील स्वर्गीय महादेव आवताडे यांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त भव्य कीर्तन सोहळा भजन आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रथमेश पूजन माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी आमदार समाधान आवताडे, नगरसेवक डोके, सुभाष मस्के, प्रशांत देशमुख आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## जालन्यात समृद्धी महामार्गावर भीषण अपघात, मजुरांच्या गाडीला ट्रकची धडक, ८ जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : जालन्यात समृद्धी महामार्गावर बुधवारी झालेल्या भीषण अपघातामध्ये आठ जणांचा मृत्यू झाला आहे. तर दोन जण गंभीर जखमी आहेत. प्राथमिक माहितीनुसार, समृद्धी महामार्गावरील झाला. कडवंची गावाकडून जालना शहराकडे येणाऱ्या मजुरांच्या पिक अपला मागून येणाऱ्या भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत आठ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये सहा महिलांचा समावेश आहे. या महिला समृद्धी महामार्गावर सफाईचे काम करत होत्या. काम आटोपून या महिला पिकअप व्हॅनमध्ये बसल्या होत्या. त्यावेळी मुंबईच्या दिशेने निघालेल्या भरधाव ट्रकने पिकअप व्हॅनला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, आठ महिलांनी जागेवरच प्राण सोडला. हा अपघात झाल्यानंतर मदतीसाठी पोलीस घटनास्थळी उशीरा पोहोचले, असा आरोप होत आहे. यामुळे स्थानिक नागरिक संतापले होते. या अपघाताचे नेमके कारण अद्याप कळू शकलेले नाही.

## कळंब- येरमाळा महामार्गावरील मस्सा (खं) येथील हॉटेल फोडून चोरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मस्सा (खं) येथे येरमाळा कडे जाणाऱ्या रस्त्यावरच्या बाजूला असलेले हॉटेल मोसमी व श्रिषा रसवंतीगृह आहे. या हॉटेल मध्ये तब्बल दोन वेळा हॉटेलच्या मागील बाजुचा पत्रा कापून चोरी केल्याची घटना घडली आहे. या चोरी केलेल्या चोरांनी कळंब पोलिसांना आव्हान दिले आहे. या बाबत पोलिस सुत्रांकडुन माळालेली माहीती नुसार मस्सा (खं) येथेल बजरंग साहेबराव ताटे यांचे हॉटेल मोसमी व श्रिषा रसवंतीगृह आहे. या हॉटेल मधून

**तब्बल दोन वेळा एकच हॉटेल फोडून चोरी केल्याने कळंब पोलिसांना आव्हान**

एक सोनी कंपनीचा लॅपटॉप, साऊड स्पिकर, दुध तापवण्याचे दोन पातेले, थमसअप, स्प्राईड,स्टिंग,जिरा अशा प्रकारेचे शितपेयाचे बॉटल , तसेच राजम्याचे १० कट्टे, हरबरा १० कट्टे असे एकूण अंदाजे १ लाख रुपये ची चोरी करण्यात आली आहे. नेहमीप्रमाणे हॉटेल उघडल्यानंतर हॉटेलचा पत्रा कापल्याचे दिसुन आले. हॉटेल मधील शितपेयाच्या बॉटल चिप्स पाकिटे, वस्तू व हरबरा राजमा कट्टे व सर्विस केबल वायर, असा एकुण १ लाख रुपये किंमतीचे वस्तु व धान्याची चोरी झाल्याचे दिसून आले.त्यानंतर बजरंग ताटे यांनी कळंब पोलिस ठाण्यात रितसर तक्रार दाखल केली असून या तक्रारीच्या प्रथम खबरीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (भा.न्या.सं) कलम ३३४(१) आणि ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चोरीमुळे परिसरातील हॉटेल व्यवसायिक व दुकानादार यांच्या मध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदरील चोरीचा तपास लवकर लावावा अशी मागणी ग्रामसथांमधुन होत आहे.



---

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १६४ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

# लोकप्रतिनिधी निवडताना शहाणपणाने मत प्रयोग केला पाहिजे : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने मत विकणे हा गुन्हा तर आहेच शिवाय तो आत्मघात ही आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १६४ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे २९ मार्च २०२६ ला संपन्न झाली.

फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, १३ ऑक्टोबर १९३५ ला येवला मुक्कामी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर २९ मार्च १९३६ ला ठाणे जिल्ह्यातील पालघर जवळील वेढी या गावी अस्पृश्य परिषदेचे जिल्हा अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी अस्पृश्यांनी अधिवेशनापर्यंत पोहोचू नये म्हणून ऑटो चालक व टांगेवाल्यांनी जाणीवपूर्वक संप पुकारला होता. इतक्या कठीण परिस्थितीत बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली आपल्या समाजाने त्या काळात आंदोलन चालविले आहे. धर्मांतराच्या पार्श्वभूमीवर बोलताना बाबासाहेब म्हणाले होते की ज्या समूहातील माणसे आम्हाला माणूस समजत नाही, त्या समूहात राहण्यापेक्षा सहृदय, सामर्थ्यवान शीलसंपन्न व निस्वार्थी समाजाशी संबंध जोडला पाहिजे. करिता धर्मांतर केलेच पाहिजे. त्या काळात विद्यार्थ्यांनी महात्मा गांधीला शिष्यवृत्ती संबंधी सहकार्य करण्यास सांगितले तेव्हा महात्मा गांधींनी जर सवलती मिळविण्यासाठीच तुम्हास हिंदू धर्मात राहायचे असेल तर तुम्ही हिंदू धर्म सोडून गेला तरी चालेल. असे स्पष्ट केले होते. जे गांधी स्वराज्य साठी एक कोटी रुपये मिळवू शकतात, त्यांना अस्पृश्य उद्धारासाठी केवळ आठ लाख रुपये मिळावेत. अशा स्थितीत अस्पृश्य उद्धार कसा होणार? करिता आपण ज्ञानवशक्ती संपादन करून खोट्या रूढीची बंधने तोडून धडाडीने स्व-उन्नतीचा मार्ग चोखाळला पाहिजे. म्हणून मते विकून नालायकांची खोगीरभरती कायदेमंडळावर केल्याने देशाचे अपरिमित नुकसान होऊन राष्ट्र अधोगतीस जाते. करिता मत विकणे हा गुन्हा तर आहेच, शिवाय तो आत्मघातही आहे. याची जाणीव ठेवून निःस्वार्थी, निर्भीड, लायक व इमानदार लोकप्रतिनिधी निवडले पाहिजेत. तदनंतर सदरील नेतृत्वावर करडी नजर ठेवली पाहिजे. तंत्रज्ञान कितीही विकसित होत असले तरी कृत्रिम बुद्धिमत्ता माणवाला शहाणपण देऊ शकणार नाही. म्हणून लोकप्रतिनिधी निवडताना शहाणपणाने मत प्रयोग केला पाहिजे. ते आपणाला विकसित करावे लागणार आहे. याची तीव्रता जनतेच्या लक्षात यावी म्हणून जाणीव जागृतीच्या अनुषंगाने आपण सदरील विषयावर कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे.



उज्धाटनपर मार्गदर्शन करतांना ॲड. अविनाश थिट्टे म्हणाले की, आपण केवळ मतच विकत नाही तर त्या माध्यमातून आपले हक्क अधिकार विकत असतो. अर्थात ज्या आदर्श महापुरुषांनी आपणास हे मिळवून दिले त्यांनाच आपण नाकारत असतो, त्यांची स्वप्ने आपण विकत आहेत. करिता असा मी जगलो हे पुस्तक आपण वाचले पाहिजे. योग्य मार्गाने जगणाऱ्याला अनेक जण वेड्यात काढत असतात. साधा नगरसेवक वर्षभरात चार चाकी गाडी कशी विकत घेतो? याची चिकित्सा, मीमांसा झाली पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना समन्वयक ॲड. राजू बागुल म्हणाले की, तंत्रज्ञान युगात जाणीवपूर्वक सामूहिक मते वळविण्याचा प्रयत्न केला जातो. ज्यात नैतिकतेची पायमल्ली करून कृत्रिम बुद्धिमत्ता व इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. ज्यामुळे अप्रत्यक्षपणे मानवीय अधिकाराचे हणन होते. २० मार्च १९२७ ला महाड सत्याग्रहात पाण्यासाठी संघर्ष करावा लागला. १० डिसेंबर १९४८ ला युडीएचआर ने पाणी हा मूलभूत अधिकार असल्याचे स्वीकारलेले आहे. अशाप्रकारे मानवी अस्तित्वाला सन्मान मिळावा म्हणून मत विकू नये.

याप्रसंगी प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ याचा ताळमेळ लावून उपाययोजना आखल्या पाहिजेत. भूतकाळाची जाणीव ठेवून वर्तमान काळात चालत राहिले तर भविष्यकाळ उज्वल होऊ शकतो. आपला नागरिकांना सार्वत्रिक प्रौढ मताधिकार मिळाले असले तरी त्याचा वापर करीत असताना संबंधित पक्षाच्या जाहीरनाम्याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. राजकारण हे एक व्यवसाय आहे असे समजून त्यात केलेली गुंतवणूक भ्रष्टाचाराच्या माध्यमातून नफ्यासह वसूल केली जाते. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, ईव्हीएम च्या माध्यमातून गठ्ठ्याने मते विकली जातात. उद्योजक शशिकांत काळे अनेक ठिकाणी लोकप्रतिनिधी बिनविरोध निवडले जावेत ही लोकशाहीची थट्टाच म्हणावी लागेल.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके आणि प्रास्ताविक इंजिनिअर किशोर पाटील यांनी तर उद्योजक मिलिंद बागुल यांनी आभार मानले

# भगवान महावीर जयंती सासवड शहरात हर्षोल्हासात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/ डॉ. विनायक गायकवाड : सासवड शहरात त्रिशलानंदन विर की जय बोलो महावीर की या जयघोषात महावीर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली दिगंबर जैन मंदिर येथे ध्वजा उभारून कार्यक्रमाला सुरुवात झाली तर कुंथुनाथ जैन मंदिर सासवड येथून वरघोडा वाद्य वृंदांच्या आणि दांडीया नृत्याच्या बरोबरीनेच महावीर स्वामींच्या जयघोषात सासवड शहरातून निघाला शहरातील सकल जैन संघ यावेळी उपस्थित होता.




या मिरवणुकीचा कार्यक्रमाचा समारोप नामदेव मंदिर येथे झाला. नामदेव मंदिर येथील कार्यक्रमांमध्ये गुणवंताचा सत्कार करण्यात आला. लहान मुलांनी विविध कलागुणांचा कार्यक्रम सादर केला तर महिलांनी महावीर स्वामी जन्म गीतावर बहारदार नृत्य सादर केले त्याचप्रमाणे दिगंबर जैन समाजाची नवीन कार्यकारणी नियुक्त करण्यात आली. त्यांचा सत्कार धनपाल पाटील व डॉ. मगदुम यांनी केला तर महावीर आरती व मंगल दिवो कार्यक्रमाचा समारोप केला.

सदर कार्यक्रम प्रसंगी सासवड शहर जैन संघटना अध्यक्ष अशोक ओसवाल, बाबुशेठ सोळंकी, कपिल सोलंकी, रमेश ओसवाल (पुजेचे लाभार्थी) विवेक सोलंकी ईश्वर बागमार गिरीश कर्नावट, शैलेश कुवाड, कपिल ओसवाल, प्रशांत गीते, उज्ज्वल सुराणा, मयुर नर्ते,विजय जैन, संतोष परभणकर, इत्यादी मान्यवर उपस्थित होते स्वामी वात्सल्यच्या कार्यक्रमाची जबाबदारी कपिल ओसवाल व निलेश डाकले विकास सोलंकी यांनी पार पाडली सूत्रसंचालन मुन्ना शेठ सोळंकी व कल्याण सुराणा यांनी पार पाडले तर आभार महेंद्र ओसवाल यांनी माणले.

# माढ्याचे आमदार अभिजीत पाटील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या भेटीला

## माढा मतदारसंघातील अनेक रखडलेल्या प्रश्नांबाबत घेतली भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री, ना.एकनाथजी शिंदे यांची मुंबईत भेट घेऊन मतदारसंघातील रखडलेल्या प्रश्नांबाबत निवेदन देऊन निधीची मागणी केली.

मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी काही महत्त्वाच्या मागण्या यावेळी मांडण्यात आल्या :

१) माढा शहरातील वाढती पाणीटंचाई लक्षात घेता प्रलंबित पाणीपुरवठा योजनांना तात्काळ मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली, जेणेकरून नागरिकांना दिलासा मिळेल.

२) छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी माढा शहरात भव्य शिवस्मारक उभारण्यासाठी ₹१० कोटी निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली. हे स्मारक ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि प्रेरणादायी ठरेल.



३) श्रीपुर-महाळुंग नगरपंचायतीसाठी स्वतंत्र प्रशासकीय इमारत उभारण्यासाठी जागा खरेदी व बांधकामासाठी ₹५ कोटी निधी देण्याची मागणी करण्यात आली, ज्यामुळे नागरिकांना अधिक कार्यक्षम व दर्जेदार सेवा मिळू शकतील.

४) माढ्यातील मनकर्णा नदी परिसराचे सुशोभीकरण व घाट बांधणीसाठी ₹१० कोटी निधीची मागणी करण्यात आली. या कामामुळे धार्मिक व पर्यटन विकासाला चालना मिळून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित होईल.

५) माढा नगरपंचायतीसाठी नवीन प्रशासकीय इमारत आणि सुसज्ज सांस्कृतिक सभागृह उभारण्यासाठी ₹१० कोटी निधी देण्याची मागणी करण्यात आली, ज्यामुळे शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाला गती मिळेल.

या सर्व मागण्यांवर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लवकरच सकारात्मक निर्णय घेऊन माढा मतदारसंघाला भरघोस निधी देण्याचे सांगितले असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

# जिद्दीनं डोळस असलेली ईश्वरी ३८ किमीची सामुद्रधुनी करणार पार; जागतिक विक्रमाकरिता कसून तयारी सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : ज्यांना अशक्य वाटणाऱ्या गोष्टी कराव्याशा वाटतात, त्यांच्याकडं अत्यंत सकारात्मक 'दृष्टी'कोन असतो. त्यासाठी लौकिक अर्थाने दृष्टी असावीच लागते असे नाही, हे जलतरपटू ईश्वरी पांडे जगाला सिद्ध करून दाखवित आहे. डोळ्यांनी पाहू न शकणारी जलतरणपटू ईश्वरी कमलेश पांडे ही अतिशय आव्हानात्मक मानली जाणारी तलाईमन्नार (श्रीलंका)ते धनुष्कोडी (भारत) ३८ किलोमीटर अंतराची पाल्कची सामुद्रधुनी ही सलग १४ तास जलतरण करून पार करण्याच्या जिद्दीने समुद्रात उतरणार आहे. ही ऐतिहासिक मोहीम फत्ते केल्यास असा पराक्रम करणारी ईश्वरी ही जगातील पहिली दृष्टिबाधित जलतरणपटू ठरणार आहे.

''जागतिक विक्रम करण्यासाठी ईश्वरी रोज आठ ते दहा तास सराव करत आहे. येत्या सहा एप्रिलला २ वाजता ती श्रीलंकेच्या तलाईमन्नार येथून समुद्रात उडी घेणार आहे. त्यानंतर सलग १४ तास जलतरण करून भारताच्या धनुष्कोडी येथे ती पोहोचेल. निसर्गानं साथ दिली तर ईश्वरी निर्धारित वेळेपेक्षा आधी ही मोहीम फत्ते करेल'', असा विश्वास ईश्वरीचे प्रशिक्षक संजय बाटवे यांनी व्यक्त केला आहे. यापूर्वी ईश्वरीनं २०२४ मध्येही एलिफंटा ते गेट वे ऑफ इंडिया हे १७ किलोमीटरचे सागरी अंतर पार केलं होतं.

सहा महिन्यांपासून तलावांमध्ये कसून सराव- ईश्वरी पांडे आपली मोहीम ६ एप्रिलला पहाटे २ वाजता तलाईमन्नार जेट्टी येथून हा प्रवास सुरू करणार आहे. तर दुपारी ३ वाजेपर्यंत भारताचे टोक असलेल्या धनुष्कोडीत पोहोचणार आहे. १६ वर्षीय ईश्वरीला प्रतिकूल हवामानाबरोबरच भरती-ओहोटी, समुद्री प्रवाह, उसळणाऱ्या प्रचंड लाटा, डॉल्फिन, शार्क आणि जेलिफिशसारख्या महाकाय आणि धोकादायक समुद्री जीवांचा सामना करावा लागणार आहे. या अभियानासाठी ईश्वरी सहा महिन्यांपासून नागपूर जिल्ह्यातील विविध जलतरण तलावांमध्ये कसून सराव करत आहे.

माझ्या स्वप्नांना गवसणी घालणार:- ईश्वरी- ''अत्यंत आव्हानात्मक आणि कठीण अशी पाल्कची सामुद्रधुनी पार करण्याचे मी स्वप्न पाहिलं आहे. त्यामुळे स्वप्नपूर्तीसाठी पाच-सहा महिन्यांपासून कठोर मेहनत घेत आहे. जिद्द, चिकाटी आणि पुरेशी माझी तयारी झाली. आई- वडील प्रशिक्षकांसह नागपूरकरांच्या आशीर्वादामुळे अभियान नक्की पूर्ण करेन, असा मला पूर्ण विश्वास आहे'', असे ईश्वरी पांडे यांनी म्हटलं. आर्थिक अडचणींमधून मार्ग काढताना:- ईश्वरी प्रतिभावान दृष्टिबाधित खेळाडू आहे. कठोर मेहनत आणि जिद्दीनं ती या अभियानात तयारी करीत आहे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती फार चांगली नाही. तरीदेखील तिचे प्रशिक्षक संजय बाटवे आणि काही लोकांच्या मदतीनं इथपर्यंतचा प्रवास तिनं पूर्ण केलाय. समाजातील काही व्यक्तींनी थोडी-थोडी मदत करून हे शिवधनुष्य उचललं आहे. अनुभवी आणि तज्ञांची टीम असणार सोबत:- ईश्वरीच्या साहसी अभियानासाठी आवश्यक सर्व परवानगी घेण्यात आल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. या अभियानात ईश्वरीसोबत प्रशिक्षक संजय बाटवे असतील. यासह अतिशय अनुभवी जलतरणपटू इशांत पांडे, रवींद्र तरारे, भावी राजगिरे, संदीप वैद्य, शंकर आष्टणकर, विलास फाले आणि डॉ. नीरव पंड्या हे 'पेस स्विमर'म्हणून भूमिका पार पाडणार आहेत. त्याचबरोबर सुरक्षा आणि मार्गदर्शन करण्यासाठी सभोवती सहा ते सात बोटी राहणार आहे. तर वैद्यकीय पथक असणार आहे. अनेक स्पर्धांत केली चमकदार कामगिरी- ईश्वरीनं दहावीच्या परीक्षेत ८४ टक्के गुण प्राप्त केले. ईश्वरी दरवर्षी १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला अंबाझरी तलावामध्ये ध्वजारोहण करते. या शिवाय ईश्वरीनं अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावरील अनेक स्विमिंग स्पर्धा जिंकत नागपूरचं नाव उज्वल केलं आहे. पुन्हा एकदा जिद्द आणि कर्तबगारीच्या लाटेवर स्वार होत वाटेत येणारं प्रत्येक आव्हान परतवून लावत यशाचा किनारा गाठण्यासाठी ईश्वरी सज्ज होत आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती समितीच्या अध्यक्षपदी सुमित रणदिवे यांची निवड







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कळंब शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, जयंती उत्सवाचे नियोजन करण्यासाठी मध्यवर्ती समितीची घोषणा करण्यात आली आहे. दि.३१ मार्च २०२६ रोजी मंगळवारी विश्वरत्न,महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे विश्वस्त सुनिल गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी विश्वरत्न बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती समिती,पुतळा परिसर, कळंबच्या अध्यक्षपदी सुमित रणदिवे यांची निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी शिवाजी शिरसाट,कोषाध्यक्षपदी राजाभाऊ गायकवाड, सचिवपदी मुकेश गायकवाड तर प्रसिद्धीप्रमुखपदी अविनाश घोडके यांची निवड करण्यात आली आहे. याशिवाय माणिक गायकवाड, महादेव धीरे, रमेश भोसले, मोहन गायकवाड, सागर पटेकर, सुरज गायकवाड, शहाजी शिरसाट, नामदेव गायकवाड, किशोर मगर, निलेश गवळी, सुरज रणदिवे, निखील कांबळे, शुभम गायकवाड, गौतम शिरसाट, सुशील गायकवाड आदी सदस्यांचीही कार्यकारिणीत निवड करण्यात आली.

बैठकीत यंदाच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक व प्रबोधनपर उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, यात नामवंत वक्त्यांची व्याख्यान माला, समाजप्रबोधनपर गीत गायन कार्यक्रम तसेच विद्यार्थ्यांसाठी जनरल नॉलेज स्पर्धा यांचा समावेश आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कळंब शहरात मोठ्या उत्साहात व सामाजिक ऐक्याच्या वातावरणात साजरा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# महाराष्ट्राला अवकाळीचा तडाखा सुरुच, मराठावाडा....

(पान १ वरून...) सह्याद्रीच्या पट्ट्यात सायंकाळी अवकाळी पावसानं हजेरी लावली, तर जिल्ह्यातील बहुतांश ठिकाणी ढगाळ वातावरण पाहायला मिळालं. हवामान विभागाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज व्यक्त केला होता. आज झालेल्या पावसानं आंबा,काजू पिकाचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील जुनोनी आणि आसपासच्या परिसराला अवकाळी पावसानंने झोडपले. अनेक ठिकाणी गारांचा पाऊस झाला. द्राक्ष बागांना पावसामुळं मोठा फटका बसला.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात उंडाळे, ओंड सह परिसरात अचानक वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांची एकच तारांबळ उडाली. सोसाट्याच्या वाऱ्यासह ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडासह पडणाऱ्या पावसामुळे नागरिकांची अक्षरशः तारांबाळ उडाली आहे.गारपीट झाल्याने आंबा पिकासह काढणीस आलेल्या ज्वारी पिकाचे नुकसान होणार असल्याने शेतकरी चिंतेत पडला आहे. मात्र गेल्या दोन दिवसापासून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना पाऊस पडल्याने दिलासा मिळाला आहे.

सातारा-पुणे राष्ट्रीय महामार्गावर खंडाळा पारगाव परिसरात अचानक आलेल्या जोरदार वाऱ्याने आणि अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला.

### ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मुसळे आणि चित्रपट गीतकार डॉ. विनायक पवार यांची प्रमुख उपस्थिती

# दिवंगत कवी डॉ. विशाल इंगोले स्मृती पुरस्काराचे ५ एप्रिल रोजी वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

दुसरबीड येथील सावित्रीबाई मंगल कार्यालयात दिनांक ०५ एप्रिल रोजी दिवंगत कवी डॉ. विशाल इंगोले स्मृती राज्यस्तरीय साहित्यकृती पुरस्कार वितरित केला जाणार आहे. हा पुरस्कार ज्येष्ठ कादंबरीकार बाबाराव मुसळे यांच्या हस्ते आणि सुप्रसिद्ध चित्रपट गीतकार डॉ. विनायक पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान केला जाणार आहे. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ मार्गदर्शक तळेकर गुरुजी अध्यक्ष म्हणून लाभणार आहेत.





बुलढाणा जिल्ह्यातील प्रथितयश कवी डॉ. विशाल इंगोले यांच्या स्मृती तेवत ठेवण्यासाठी लोकजागर परिवार आणि मित्र मंडळाच्या वतीने मागील वर्षीपासून त्यांच्या नावे उत्कृष्ठ कवितासंग्रहास पुरस्कार देणे सुरू केले आहे.

या वर्षीचा पुरस्कार कवी तान्हाजी बोऱ्हाडे यांच्या जळताना भुई पायतळी या कवितासंग्रहास जाहीर करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन लोकजागर परिवार व डॉ विशाल इंगोले मित्र परिवार संयोजन समितीतील सदस्यांनी केले आहे

# कळंब येथे उपअभियंता दत्तात्रय पाचंगे यांचा सेवापुर्ती निमित्त सपत्नीक सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : धाराशिव जिल्हा परीषद ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग कळंब येथील उप अभियंता या पदावरून आज वयोमाना नुसार सेवानिवृत्त झालेले श्री.दत्तात्रय तुळशीराम पाचंगे यांचा सपत्नीक सत्कार व निरोप समारंभाचा कार्यक्रम पंचायत समीती कळंब येथील सभागृहात आयोजीत करण्यात आला होता. या प्रसंगी कळंब येथे बदली झाल्यानंतर त्यांना केवळ सात महिन्यांच्या कार्यकाळ काम करण्याकरीता मिळाला असतानाही त्यांनी कळंब तालुक्यातील अनेक प्रलंबीत व विवादीत ठिकाणच्या पाण्याच्या टाक्या करीताचे जागेचे प्रश्न नागरीक व स्थानिकांचे सहकार्याने कायमचे सोडवले.




हिंगणगाव, आढाळा, आंदोराया गावांना पाणी पुरवठा होण्याकरीता आपल्या कौशल्यपुर्ण कर्तव्याने आवश्यक कामे केली.

माळकरंजा येथीलही अनेक वर्षांपासूनचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सातत्याने पाठपुरावा करून सोडवला.

येरमाळा येथील तिर्थक्षेत्र विकास कामातील पाणी पुरवठ्याचे महत्वपुर्ण काम पुढील पंचविस वर्ष भाविकांच्या लोकसंख्येच्या तुलनेत वाढीव पाण्याचे काम मोठ्या प्रमाणावर मार्गी लावलें, तालुक्यातील ग्रामीण भागातील सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामाला गतिमान केले.

अशी अनेक कामे त्यांना मिळालेल्या केवळ सात महिन्यांच्या कालखंडात त्यांनी पार पाडली.

हे करत असताना वाशी येथीलही ग्रामीण पाणीपुरवठा उपअभियंता या पदाचाही अतिरीक्त पदभार स्विकारून तेथीलही अनेक कामे मार्गी लावली.

त्यांनी केलेल्या कार्याची माहीती देताना,दत्तात्रय पाचंगे हे अतिशय मनमिळाऊ व पारदर्शकपणे आपले कर्तव्य बजावणारे व्यक्तिमत्व असल्याचे गौरवोद्गार येथील जेष्ठ सामाजिक कार्येकर्ते संतोष भांडे यांनी काढले. तर गट विकास अधिकारी श्री. सोपान अकेले यांनी खुष रहना मेरे यार हे गीत गावून आपल्या अनोख्या शैलीत श्री.पाचंगे यांना पुढील दिर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. तसेच सतपालभाऊ बनसोडे व सभापती सौ.राजश्रीताई वरपे यांनीही पाचंगे यांची प्रामाणिकता व साधेपणा यावर भाष्य करत शुभेच्छा दिल्या,असे अधिकारी फारच तुरळक आणि हिरीरीने काम करताना दिसतात, असे मत ही या प्रसंगी अनेक वक्त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी पंचायत समीती सभापती सौ. राजश्रीताई वरपे, गटविकास अधिकारी. श्री.सोपान अकेले, सहाय्यक गटविकास अधिकारी सौ.मनिषा सुकाळे, जेष्ठ सामाजिक कार्येकर्ते संतोष भांडे, सतपालभाऊ बनसोडे, बांधकाम उप अभियंता श्री.बारंगुळे, अभियंता रणजीत ओव्हाळ, हनुमंत बोंदर, बाळासाहेब मुंडे, श्री.सावंत, सौ.करूणा चक्रे, संदिप करडे, रमेश जानराव, अविनाश लोमटे, संतोष थोरात, अंजली भालेराव, शुभम जाधव यांच्या सह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.